IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 4, December 2023

# नवीन शैक्षणिक धोरण (2020) व शारीरिक शिक्षणाची प्रासंगिकता

**डॉ. प्रा. वसंत निनावे**
सहयोगी प्राध्यापक
शारीरिक शिक्षण
न. प. शिवाजी महाविद्यालय
मोवाड, जि. नागपूर
Mail Id-vtninave@gmail.com

**सारांश:**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय शिक्षा नीति , 2020 आणले असून ते सर्वांशी चर्चा करून तयार करण्यात आले आहे. त्याच्या परिचयाने देशात शिक्षणाची व्यापक चर्चा सुरू झाली आहे. शिक्षणाच्या संदर्भात गांधीजी यांच्यानुसार बालक आणि मनुष्याच्या शरीराचा, मनाचा आणि आत्म्याचा सर्वांगीण आणि उत्कृष्ट विकास होय. तसेच स्वामी विवेकानंद म्हणाले की, शिक्षण हे माणसातील अंगभूत परिपूर्णता व्यक्त करणे आहे. या सर्व चर्चेदरम्यान 1986 च्या शैक्षणिक धोरणात कोणकोणत्या उणिवा राहिल्या होत्या, त्या दूर करण्यासाठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणण्याची गरज होती. केवळ संबंधित विषयाचा अभ्यास करून विद्यार्थ्यांचा पूर्ण विकास होऊ शकत नाही. संपूर्ण विकासासाठी विद्यार्थ्यांना कला, शारीरिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. यासाठी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये संभाव्य शिक्षकांच्या नियुक्तीवरही भर देण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार शिक्षक भरतीतही गुणवत्तापूर्ण पदोन्नतीची चर्चा आहे. शाळेच्या कामकाजाच्या वातावरणात आणि संस्कृतीत आमूलाग्र बदल करणे हे प्राथमिक ध्येय आहे, जेणेकरून शिक्षक आणि विद्यार्थी दोघेही त्यांच्या जास्तीत जास्त स्तरावर

विकसित होऊ शकतील. याच अनुषंगाने प्रस्तुत शोधपत्रात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व शारीरिक शिक्षणाची स्थिती व आवश्यकता यावर चिंतन करण्यात आलेले आहे.

**बिजशब्द:** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण,(2020) शारीरिक शिक्षण, खेळ, आरोग्य